# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष महासभा

### मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. विशेष महासभा दि. ०२/१२/२०१०**

आज गुरुवार दि. ०२/१२/२०१० रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा दुपारी ०३.४५ वाजता सभा सुचना क्र. ०८ दि. २४/११/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. पिठासिन अधिकारी श्री. निर्मलकुमार देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | तुळशीदास दत्तु म्हात्रे | महापौर |
| २) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | सभापती, स्थायी समिती |
| ३) | प्रभात प्रकाश पाटील | सभागृह नेता |
| ४) | मिलन गोविंदराव पाटील | विरोधी पक्षनेता |
| ५) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ६) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ७) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| ८) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| ९) | जाधव मोहन महादेव | गटनेता |
| १०) | नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| ११) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १२) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १३) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| १४) | पाटील जयंत महादेव | सदस्य |
| १५) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १६) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| १७) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| १८) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १९) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| २०) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| २१) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| २२) | शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| २३) | म्हात्रे नयना गजानन | गटनेता |
| २४) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| २५) | डिमेलो बर्नेट आल्बर्ट | सदस्या |
| २६) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| २७) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| २८) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| २९) | परेरा कॅटलीन ॲन्थोनी | सदस्या |
| ३०) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| ३१) | शर्मा भगवती | गटनेता |
| ३२) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३३) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ३४) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ३५) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ३६) | वर्षा भानुशाली | सदस्या |
| ३७) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| ३८) | जंगम लक्ष्मण गणपत | सदस्य |
| ३९) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४०) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४१) | पुजारी कांचन शेखर | सदस्या |
| ४२) | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | सदस्या |
| ४३) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ४४) | खान शफिक अहमद सादत | सदस्य |
| ४५) | सरिता चंद्रकांत म्हात्रे | सदस्या |
| ४६) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ४७) | वैती विजया हेमचंद्र | सदस्या |
| ४८) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ४९) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ५०) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ५१) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ५२) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ५३) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ५४) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ५५) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| ५६) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ५७) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ५८) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ५९) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ६०) | प्रकाश दुबोले | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | तिवारी दिव्या अशोक | सदस्या |
| २) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| ३) | शेट्टी गणेश गोपाल | सदस्य |
| ४) | पाटील शरद केशव | सदस्य |
| ५) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ६) | फॅरो ग्रिटा स्टिफन | सदस्या |
| ७) | पाटील अनंत रामचंद्र | गटनेता |
| ८) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ९) | मेहता नरेंद्र लालचंद्र | सदस्य |
| १०) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ११) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| १२) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| १३) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| १४) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| १५) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| १६) | प्रमोद जयराम सामंत | सदस्य |
| १७) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| १८) | गावंड मंदाकीनी आत्माराम | सदस्या |
| १९) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| २०) | संजय नारायण पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| २१) | परशुराम दा. पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| २२) | अरुण बाबाजी कदम | नामनिर्देशित सदस्य |
| २३) | आसिफ गुलाम पटेल | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज**

| | | |
|---|---|---|
| १) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |

**नगरसचिव :-**

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची विशेष मा. महासभा गुरुवार दि. ०२/१२/२०१० रोजी दुपारी ३.४५ वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०८, दि. २४/११/२०१०

रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ६२, मिरा भाईंदर महानगरपालिका सदस्यांपैकी एका सदस्याची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(५) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे उपमहापौर पदावर निवड करुन नवीन उपमहापौर उर्वरीत कालावधीकरीता पद धारण करतील. दि. २६/११/२०१० रोजी उपमहापौर पदासाठी नामनिर्देशनपत्र स्विकारण्याची वेळ होती. सदरच्या वेळेमध्ये श्री. जयंत महादेव पाटील यांचे नामनिर्देशनपत्र आलेले आहे ते मी पिठासीन अधिकारी यांचेकडे सुपूर्द करतोय.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उपमहापौर पदासाठी श्री. पाटील जयंत महादेव यांनी नामनिर्देशनपत्र भरलेले आहे. हे एकच नामनिर्देशन पत्र प्राप्त झालेले आहे. नामनिर्देशन पत्र वैध आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका उपमहापौर निवडणूक या पदासाठी फक्त एकच नामनिर्देशनपत्र प्राप्त झालेले आहे. आणि आता छाननी केल्यानंतर वैध आहे असे आढळून आले. निवडणूकीचा निकाल मी खालील प्रमाणे जाहीर करत आहे. उपमहापौर हे एकच पद असल्याने व उमेदवार एकच राहिल्याने निवडणूक घेण्याची आवश्यकता नाही. सबब श्री. पाटील जयंत महादेव हे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उपमहापौर पदावर उर्वरित कालावधीसाठी बिन विरोध निवडून आल्याचे मी याव्दारे घोषीत करत आहे.

**नगरसचिव :-**

मी नवनिर्वाचित उपमहापौर श्री. जयंत पाटील यांना डायसवर बोलवून पिठासीन अधिकारी त्यांचा सत्कार करणार आहेत मी त्यांना विनंती करतो त्यांनी डायसवर यावे.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

श्री. जयंत महादेव पाटील यांचे आपल्या सर्वांच्या वतीने अभिनंदन. आपण कृपया डायसवर यावे.

**मिलन पाटील :-**

महापौर साहेब, आजचे आमचे नेते जयंतदादा पाटील ते आज उपमहापौर पदावर आरूढ झाल्याकारणाने मी त्यांच मी अभिनंदन करतो. दादासाहेब योगायोग असा आहे. बघा साडेतीन पीठे असतात देवीची. मुहूर्त साडेतीन असतो. तसा या महापालिकेला महापौर आगरी, उपमहापौर आगरी, सभागृहनेता आगरी आणि मी अर्धा विरोधी पक्षनेता आगरी असे साडेतीन पीठाचा आणि साडेतीन मुहर्ताचा हा योग महापालिकेला लाभलेला आहे. आणि हे साडेतीन लोक या महापालिकेचा उध्दार करतीलच आणि या शहराची उच्च अवस्था मिळवून या शहरामध्ये लौकीक आहे. महाराष्ट्रामध्ये लौकीक आहे. हे आम्ही तिघेजण साडेतीन लोक आम्ही हे सिध्द करून दाखवू की बघा या साडेतीन पीठांपैकी आणि साडेतीन मुहूर्तामध्ये सुध्दा साडेतीन असतात.

**भगवती शर्मा :-**

माझी एक रिकवेस्ट आहे की, स्टँडींग के बीना आप कुछ नही कर सकते।

**वंदना चक्रे :-**

उपमहापौरांच अभिनंदन करते. आपण पाटील साहेब मला एक शब्द बोलायचा आहे की, इथे सचिव साहेब पण आगरी समाजाचे आहेत. त्यांच पण नांव घ्यायला पाहिजे होतं.

**ओमप्रकाश अग्रवालः-**

महापौर साहेब, जयंतदादा पाटील हे मागच्या ग्रामपंचायत पासून ते आतापर्यंत अनेक पदे या महानगरपालिकेच्या सभागृहामध्ये भुषविलेली आहेत. यावेळी महापालिकेचा त्यांना उपमहापौर पदाचा मान दिलेला आहे. या सभागृहामध्ये भारतीय जनता पार्टी तर्फे मी त्यांच अभिनंदन करतोय. आणि प्रत्येक समाजाला आपल्या जातीचा अभिमान असतो. त्यामध्ये दुमत नाही. पण सभागृहात आमच्या विरोधी पक्षनेत्यांनी जी भाषा वापरली ती चुकीची आहे. अशी भाषा या सभागृहामध्ये वापरू नये अशी माझी विनंती आहे. समाजाचा मान असलाच पाहिजे. जो ज्या समाजाचा असतो त्याचा मान असलाच पाहिजे. पण साडेतीन आगरीच या शहराचा भले करू शकतो ही बाब सभागृहात बोलणं आम्हाला त्याच दुःख वाटलेले आहे. कमीत कमी याचे विरोधी पक्ष नेत्यांनी भान ठेवावे.

**एस.ए. खान :-**

महापौर साहेब, जयंतदादा पाटील उपमहापौर पदी निवड झाली म्हणून मी संयुक्त लोकशाही आघाडीतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**प्रविण पाटील :-**

आजचे गावाचे मा. नगरसेवक जयंतदादा पाटील आज बिनविरोध उपमहापौर पदी निवडून आल्याबद्दल शिवसेना पक्षातर्फे व नवघर गावातर्फे मी त्यांचे हार्दिक स्वागत अभिनंदन करतोय.

**लक्ष्मण जंगम :-**

ह्या ठिकाणी स्थायी समिती सभापती स्टिवन मेंडोसा साहेब तसेच उपमहापौर म्हणून जयंत पाटील साहेब या दोघांची या ठिकाणी नियुक्ती झालेली आहे. मी सर्व सभागृहाच्या वतीने त्यांचे हार्दिक स्वागत करतो, हार्दिक अभिनंदन करतो धन्यवाद.

**मधुसुदन पुरोहित :-**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने आज मी मा. जयंत पाटील साहेब यांच हार्दिक अभिनंदन करतो व स्थायी समिती सभापती नियुक्त झालेले मी श्री. स्टिवन मेंडोन्सा साहेब यांचा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने हार्दिक अभिनंदन करतो जय हिंद। जय महाराष्ट्र।

**एस.ए. खान :-**

स्टिवन जॉन मेंडोन्सा यांची स्थायी समिती सभापती पदी निवड झाल्याबद्दल मी संयुक्त लोकशाही आघाडी तर्फे मी हार्दिक अभिनंदन करतोय.

**आसिफ शेख :-**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने या ठिकाणी माजी सभागृह नेते, या सदनाचे जेष्ठ नगरसेवक जयंत दादा पाटील यांची उपमहापौर पदी निवड झाली. त्याचप्रमाणे माजी उपमहापौर व आता नवनियुक्त स्थायी समिती सभापती आमचे परममित्र स्टिवन जॉन मेंडोन्सा साहेब यांची स्थायी समिती सभापतीपदी निवड झाली. या दोन्ही नेत्यांच राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने आणि आपल्या शहराचे प्रथम नागरिक आपल्या शहराचे प्रथम आमदार या शहराचे भाग्यविधाते आदरणीय गिल्बर्ट शेठ मेंन्डोन्सा यांच्या वतीने देखील या दोन्ही नेत्यांच मी मनपूर्वक अभिनंदन व्यक्त करीत आहे. धन्यवाद.

**नयना म्हात्रे :-**

उपमहापौर साहेब आज खरोखरच त्यांच्यासाठी भाग्याचा दिवस उगवलेला आहे. खरोखर किती वर्षापासून ते राजकारण करतात. जवळ जवळ वीस वर्ष झाली आणि खरोखर सुंदर दिवस उगवला. आणि महापौर, उपमहापौर, प्रभात ताई नवघरलाच राहतात. पण आमच्या इकडे दुर्लक्ष करू नका. कारण तुम्ही तिघेही तिकडेच रहाता आणि डायरेक्ट गाड्या तिकडेच जाणार आहेत. आमच्याकडे देखील बघा. तसे स्थायी समिती सभापती आमच्याकडेच आहेत. आम्हाला घाबरायचे कारण नाही. खरोखरच मी तुम्हाला शुभेच्छा देते.

**भगवती शर्मा :-**

आज मिरा भाईंदर महानगरपालिका उपमहापौर के पदमें श्री. जयंतदादा पाटील की बिन विरोध चुनाव हुआ उसीके साथ के अंदर में स्थायी समिती के सभापती पदी श्री. स्टिवन मेंडोन्सा साहेब की नियुक्ती हुई। सबसे बडी खुशी की बात ये है की, दोनो पद की पालिका के इतिहास के अंदर मे बिन विरोध नियुक्ती हुई। चुनाव हुआ है इसके लिए सभी पक्षके नगरसेवकोंके और सभी पक्षके नेताओंका हार्दिक अभिनंदन और आभार प्रगट करता हुँ। साथमें जयंतदादा पाटील और स्टिवन मेंडोन्सा साहब का मै हार्दिक अभिनंदन करता हूँ।

**मिलन पाटील :-**

आज स्थायी समिती सभापती पदी स्टिवन मेंडोन्सा साहेब यांचे निवड झाल्याबद्दल मी त्यांच अभिनंदन करतो. तसेच जयंतदादा पाटील यांचे उपमहापौर झाल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. जय हिंद। जय महाराष्ट्र।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महापौर साहेब, पाटील साहेबांना उपमहापौर पद भेटले, पाटील साहेबांचे हार्दिक अभिनंदन करतो. श्री. स्टिवन मेंडोन्सा यांना सुध्दा स्थायी समिती सभापती पदी निवड झाल्याबद्दल त्यांचे ही हार्दिक अभिनंदन.

**जयंत पाटील :-**

सभागृहात उपस्थित सर्व नगरसेवक, पदाधिकारी, सभागृहनेते, विरोधी पक्ष नेते, सर्व पक्षांचे गटनेते माझ्या नगरसेवक भगीनी, उपस्थित झालेला जनसमुदाय, पत्रकार बंधु प्रथमतः मी आभार मानेन की आमचे आमदार आमचे लाडके नेते, गिल्बर्ट शेठ यांनी मला या पदाला लायक समजल आणि मला उपमहापौर पदी फॉर्म भरण्याची संधी दिली आणि बिनविरोध मी निवडून आल्याबद्दल सर्व पक्षांचे मी आभार मानतो की त्या पक्षांनी फॉर्म भरला नाही. म्हणून मी बिनविरोध निवडून आलो. म्हणून सर्व पक्षांचा आभारी आहे. या शहरामध्ये अनेक समस्या आहेत. खास करून आपली पाण्याची मोठी समस्या आहे, आरोग्याची समस्या आहे. मला खात्री आहे की, आपण मला संपूर्ण सहकार्य द्याल. शहरातील प्रश्न सोडविण्यासाठी आपण सगळयांनी मिळून एकत्रितपणे काम करूया. आणि येत्या दिड वर्षामध्ये हे शहर आपल्याला अभिमानास्पद वाटल पाहिजे. अशी भावना मनाशी बाळगूया. आणि याक्षणी पुन्हा एकदा मी सर्वांचे आभार मानतो. जास्त काही बोलत नाही. नंतर कधीतरी महासभेमध्ये व्यासपीठावर भरपूर बोलायचे आहे. तेव्हा यावेळी सगळ काही न संपवता पुन्हा एकदा आपले आभार मानतो जय हिंद। जय महाराष्ट्र।

**मा. महापौर :-**

मिरा भाईंदर महापालिकेचे सर्व नगरसेवक, नगरसेविका, विरोधीपक्ष नेता, पत्रकार बंधु आणि त्याचप्रमाणे आता ही जी निवडणूक झाली ते प्रथमतः स्टिवन मेंडोन्सा यांना स्थायी समिती सभापती निवडून दिल्याबद्दल बिनविरोध आणि जयंत पाटील यांना उपमहापौर पदी निवडून दिल्याबद्दल आपल्या सर्वांचे मी आभार मानतो. अशाच तऱ्हेने तुम्ही मिटींग चालवितांना सर्वांनी सहकार्याची भूमिका ठेवा. आणि पुढील दिड वर्षाचा जो काही इतिहास राहिला असेल तो गोळा करून घ्या. जय हिंद! जय महाराष्ट्र!

**प्रकरण क्र. ६२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका सदस्यांपैकी एका सदस्याची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(५) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे उपमहापौर पदावर निवड करुन नवीन उपमहापौर उर्वरीत कालावधीकरीता पद धारण करतील.

**ठराव क्र. ६० :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(५) मधील तरतुदींनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उपमहापौर पदाकरिता निश्चित केलेल्या तारखेस व वेळेस नामनिर्देशन पत्रे मागविली असता एकाच उमेदवाराने नामनिर्देशन पत्रे दाखल केली होती. त्या सदस्यांची नांवे पुढीलप्रमाणे :-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनिमय १९४९ मधील प्रकरण २ कलम १९ (५) अन्वये उपमहापौर पदावर नेमणुक करणेसाठी निश्चित केलेल्या तारखेस व वेळेत नामनिर्देशन पत्र मागविली असता श्री. पाटील जयंत महादेव ह्यांनी आपले नामनिर्देशन पत्र दाखल केले. नामनिर्देशन पत्रांची छाननी केली असता नामनिर्देशन पत्र वैध ठरलेले आहे. ''उपमहापौर'' पद हे एकच असल्याने व उमेदवार एक असल्याने मतदान घेण्याची आवश्यकता नाही. सबब श्री. पाटील जयंत महादेव हे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या **उपमहापौर** पदावर उर्वरीत कालावधी करीता बिनविरोध निवडून आल्याचे मी घोषीत करीत आहे.

**सही/-**
**पिठासिन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

निवडणूकीचा कार्यक्रम संपलेला आहे.

**(सभा संपल्याची वेळ :- सायं. ४.०० वा.)**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**